नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २७४ | Issue - 274 | वार गुरुवार दि. २० फेब्रुवारी २०२५ | Blow- Thursday Date 20 February 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सवाचा सोहळा

## दिमाखात आणि पारंपारिक पद्धतीने जयंती साजरी; शिवनेरीवर लहान मुलांनी साहसी क्रीडा प्रकाराचे केले सादरीकरण







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिवरायांचे जन्मस्थान असलेले किल्ले शिवनेरीला फुलांनी सजवण्यात आलं होतं. किल्ले शिवनेरीवर शिवजयंती निमित्त शासकीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवरायांना नमन केलं. शिवजयंतीच्या या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवारही उपस्थित होते, तसेच, अनेक नेत्यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. यावेळी अनेक साहसी क्रीडा प्रकारांचे सादरीकरण केले. शिवनेरीवर लहान लहान मुलांनी या साहसी क्रीडा प्रकारांचे सादरीकरण करुन साऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं. यावेळी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची आठवण करुन दिली.

तसेच, शिवनेरीवर आल्यावर एक वेगळीच ऊर्जा अंगात संचारते असं एकनाथ शिंदे म्हणाले. जिथे शिवरायांचा जन्म झाला तिथे अत्यंत दिमाखात आणि पारंपारिक पद्धतीने त्यांची ३९५ वी जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी शिवजन्माचा पाळणा जोजावण्यात आला. त्यानंतर महिलांनी याचं नाव ठेवलं शिवाजी, शिवाजी, शिवाजी... असं सांगितलं. तिनही नेत्यांच्या उपस्थितीत शिवजन्माचा पाळणा जोजावण्यात आला. शिवजन्मोत्सवावेळी शिवभक्तांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणा दिल्या. यावेळी संपूर्ण परिसर हा शिवरायांच्याा नावाने दुमदुमला.

# रेखा गुप्ता होणार दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : नुकत्याच पार पडलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने दमदार विजय मिळवत 70 पैकी 48 जागा जिंकल्या होत्या. यानंतर आता भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ पक्षाने रेखा गुप्ता यांची नेतेपदी निवड केली आहे. त्यामुळे रेखा गुप्ता या दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपा विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी निवड केल्यानंतर रेखा गुप्ता यांनी, पक्षाने त्यांना आशीर्वाद दिल्याचे म्हटले आहे.

भाजपने त्यांच्या एक्स हँडलवर दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाबाबतची माहिती देत रेखा गुप्ता यांचे अभिनंदन केले आहे. भाजपाने पोस्ट करत म्हटले की, दिल्ली भाजपा विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड झाल्याबद्दल रेखा गुप्ता यांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा. तुमच्या नेतृत्वाखाली राज्य प्रगती करेल असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

रेखा गुप्ता यंदाच्या निवडणुकीत दिल्लीच्या शालीमार बाग विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आल्या आहेत. त्या भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा देखील आहेत. 2025 च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत रेखा गुप्ता यांनी शालीमार बाग विधानसभा मतदारसंघातून आम आदमी पक्षाच्या वंदना कुमारी यांचा 29595 मतांनी पराभव केला आहे.

दरम्यान दिल्ली विधानसभा निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. एकीकडे आम आदमी पक्षाकडून सत्ता कायम राखण्यासाठी जोर लावला जात होता तर दुसरीकडे भाजपाकडून दिल्लीतील 27 वर्षांची सत्तेची प्रतीक्षा संपवण्यासाठी जोरदार प्रचार करण्यात येत होता. काँग्रेस आणि आप यांच्यात न झालेल्या युतीचा भाजपाला फायदा होईल असे मानले जात होते. 8 फेब्रुवारी रोजी जाहीर झालेल्या निकालांनतर दिल्लीची सत्ता भाजपाकडे जाणार, याचे चित्र स्पष्ट झाले होते. दिल्लीत भारतीय जनता पक्षाने 48 तर आम आदमी पक्षाने 22 जागांवर विजय मिळवला आहे. काँग्रेसला यंदा सलग तिसऱ्या विधानसभा निवडणुकीत एकही जागा जिंकता आलेली नाही.

हरियाणातील जिंद जिल्ह्यात जन्मलेल्या रेखा गुप्ता 50 वर्षांच्या आहेत. रेखा गुप्ता यांचे कुटुंब 1976 मध्ये दिल्लीला स्थलांतरित झाले होते. त्यानंतर त्यांचे शिक्षण आणि राजकीय कारकिर्द दिल्लीतच घडली. रेखा गुप्ता यांनी एलएलबीचे शिक्षण घेतले असून, त्या व्यवसायाने वकील देखील आहेत.

# पुढील पाच वर्षात २५ हजार नव्या बसेस खरेदी करणार : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## सोलापूरला लवकरच नव्या कोऱ्या बसेस उपलब्ध करून देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : राज्य शासन दरवर्षी पाच हजार बसेस याप्रमाणे पुढील पाच वर्षात २५ हजार नवीन बसेस खरेदी करणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व आगारांना नवीन बसेस उपलब्ध करून देण्याचे नियोजन असून सोलापूर विभागातील प्रत्येक आगारालाही लवकरच नव्या बस उपलब्ध करून दिल्या जातील. सध्या बार्शी आगाराला १० नव्या बसेस मिळाल्या असून अशाच उर्वरित ८ आगारांना देखील नवीन बसेस देण्यात येणार असल्याची ग्वाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.



आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोलापूर बस स्थानकाला भेट देऊन पाहणी केली, त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सोलापूर बस स्थानकामधील प्रसाधनगृहाची पाहणी केली. प्रवासासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, कर्मचाऱ्यांसाठी विश्रांतीगृह या बाबतीत अधिकाऱ्याशी चर्चा केली. यावेळी अनेक कर्मचारी व प्रवासी संघटनांनी बसेस, बसस्थानक व कर्मचाऱ्यांच्या प्रश्ना संदर्भात निवेदने सादर केली.

स्थानिक आमदार श्री. विजय देशमुख यांनी मंत्री सरनाईक यांची भेट घेऊन बसस्थानक सुधारणेबाबत व बसेसच्या कमतरतेबाबत चर्चा केली. लवकरात लवकर सोलापूर विभागाला नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची ग्वाही मंत्री सरनाईक यांनी आमदार देशमुख यांना दिली.

येत्या ५ वर्षात २५ हजार बसेस घेणार

यावेळी परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले राज्य शासनाने दरवर्षी ५ हजार नवीन कोऱ्या एसटी बसेस महामंडळाला घेऊन देण्याचे निश्चित केले आहे. याप्रमाणे पुढील पाच वर्षात २५ हजार बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. जेणेकरून भविष्यात सर्व सामान्य प्रवासी जनतेचा प्रवास अत्यंत सुखकर आणि सुरक्षित होईल.

या भेटी दरम्यान एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी व अन्य अधिकारी, कर्मचारी व प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘एनजीटी’चे ‘यूपीपीसीबी’वर ताशेरे; महाकुंभ सुरू होण्यापूर्वीपासून पाहणी

गंगा स्वत:हून स्वच्छ होत असल्याच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह

# गंगा प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात धोक्याचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : प्रयागराजमध्ये वाहणाऱ्या गंगा आणि यमुना या नद्यांच्या पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात विष्ठेत असणारे जिवाणू (एफसी) आढळल्याची माहिती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) नुकतीच दिली. ‘सीपीसीबी’ने यासंबंधीचा अहवाल राष्ट्रीय हरित लवादाच्या (एनजीटी) मुख्य खंडपीठासमोर सादर केला. प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभासाठी कोट्यवधी भाविकांनी हजेरी लावत असताना ही चिंताजनक माहिती उघड झाली आहे.

‘सीपीसीबी’ने ३ फेब्रुवारीला तयार केलेला हा अहवाल नुकताच ‘एनजीटी’च्या मुख्य खंडपीठाला सादर करण्यात आला. खंडपीठात अध्यक्ष न्या. प्रकाश श्रीवास्तव, न्या. सुधीर अगरवाल आणि तज्ज्ञ सदस्य ए सेंथिल वेल यांचा समावेश आहे. महाकुंभादरम्यान विशेष मुहूर्तांसह इतर दिवशी भाविक संगमावर मोठ्या प्रमाणात स्नान करत असल्यामुळे पाण्यात ‘एफसी’चे प्रमाण वाढले आहे असे अहवालात म्हटले आहे.

वाराणसीतील वकील सौरभ तिवारी यांनी प्रयागराजमधील गंगा व यमुनेच्या पाण्याच्या गुणवत्तेबद्दल दाखल केलेल्या तक्रारीवर ‘एनजीटी’मध्ये सुनावणी सुरू आहे. महाकुंभादरम्यान शहरातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता नद्यांमध्ये सोडले जात असल्याच्या आरोपांचीही लवादाकडून शहानिशा केली जात आहे.



नागपूर : गंगेच्या पाण्यात स्वत:ला स्वच्छ ठेवण्याची गुणवत्ता असल्याचा दावा राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या (नीरी) शास्त्रज्ञांनी केला होता. परंतु, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) ‘नीरी’च्या शास्त्रज्ञाचा हा दावा खोडून काढला आहे. ‘नीरी’चे संशोधक डॉ. कृष्णा खैरनार यांनी गंगेच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात ‘बॅक्टेरियोफेज’ राहत असून ते गंगेचे पाणी प्रदूषित होण्यापासून रोखतात, असा दावा केला होता. मात्र, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दोन्ही नद्यांचे पाणी अंघोळीसाठी योग्य नसल्याचा अहवाल दिल्याने ‘नीरी’च्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. केंद्र सरकारच्या ‘स्वच्छ गंगा मिशन’अंतर्गत डॉ. खैरनार यांच्या नेतृत्वाखाली संशोधन करण्यात आले होते. ‘सीपीसीबी’चा अहवाल समोर येताच डॉ. खैरनार यांना यावर प्रतिक्रिया विचारण्यासाठी त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेतली असता त्यांनी यावर प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

महाकुंभादरम्यान गंगेच्या पाण्याच्या गुणवत्तेबद्दल उत्तर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाने (यूपीपीसीबी) सादर केलेल्या अहवालात तपशीलांचा अहवाल आहे असे म्हणत राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) बुधवारी उत्तर प्रदेश सरकार आणि ‘यूपीपीसीबी’ला फटकारले. मंडळाने सादर केलेल्या अहवालात प्रयागराजमध्ये गंगेच्या पाण्यातील एफसी आणि ऑक्सिजनच्या पातळीसारखे पाण्याच्या गुणवत्तेच्या मापदंडांविषयी इतर तपशील पुरेसे सादर केले नाहीत असे ‘एनजीटी’ने म्हटले आहे. लवादाने राज्य सरकारला प्रयागराजमध्ये निरनिराळ्या ठिकाणी नमुने घेऊन पाण्याच्या गुणवत्तेचा सर्वात अलिकडील विश्लेषण अहवाल सादर करण्यासाठी एका आठवड्याचा अवधी दिला. ‘एनजीटी’ने मागील वर्षी डिसेंबरमध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुपालनाविषयी दाखल याचिकेवर लवादासमोर सुनावणी सुरू आहे.

भाविक जिथे जिथे स्नान करत आहेत त्या सर्व ठिकाणच्या पाण्याचे नमुने १२, १३ जानेवारीला संकलित करून त्याच्या चाचण्या करण्यात आल्या. त्यामध्ये फेकल कॉलिफॉर्म (एफसी) हे मानवी व प्राण्यांच्या विष्ठेत आढळणारे जिवाणू सापडले. स्नान करण्यासाठी नदीच्या पाण्याची प्राथमिक गुणवत्ता मानक राखण्यात अपयश आल्याचे असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर संगमाच्या वरील भागात ताजे पाणी सोडले गेले. त्यामुळे सेंद्रिय प्रदूषण काही प्रमाणात कमी झाले तरीही ‘एफसी’चे प्रमाण चिंताजनक पातळीवरच आहे.

‘यूपीपीसीबी’ घेत असलेल्या खबरदारीची ‘सीपीसीबी’नेही त्यांच्या अहवालात पुष्टी केली आहे. राज्य आणि केंद्रीय मंडळे सातत्याने पाण्याच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवून आहेत. संगमाचे पाणी आता स्नान आणि धार्मिक विधींसाठी योग्य असल्याचे अलीकडील अहवालांमध्ये सांगण्यात आले आहे, असे उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितले.

संगमाच्या पाण्यात विष्ठेतील विषाणू आढळत असल्याचे निष्कर्ष उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बुधवारी फेटाळून लावले. हे पाणी स्नान व आचमन करण्यासाठी योग्य असल्याचा दावा त्यांनी विधानसभेत बोलताना केला. ‘सीपीसीबी’सह उत्तर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळ (यूपीपीसीबी) सातत्याने संगमातील पाण्याच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवून आहेत असे ते म्हणाले. समाजवादी पक्षाचे सरकार असताना पाण्याची गुणवत्ता अधिक वाईट होती अशी टीका त्यांनी केली.

## संपादकीय....

### प्रदूषणावरून आरोप

गंगेच्या पाण्यात स्वत:ला स्वच्छ ठेवण्याची गुणवत्ता असल्याचा दावा राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या (नीरी) शास्त्रज्ञांनी केला होता. परंतु, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) 'नीरी'च्या शास्त्रज्ञाचा हा दावा खोडून काढला आहे. 'नीरी'चे संशोधक डॉ. कृष्णा खैरनार यांनी गंगेच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात 'बॅक्टेरियोफेज' राहत असून ते गंगेचे पाणी प्रदूषित होण्यापासून रोखतात, असा दावा केला होता. मात्र, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दोन्ही नद्यांचे पाणी अंघोळीसाठी योग्य नसल्याचा अहवाल दिल्याने 'नीरी'च्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. केंद्र सरकारच्या 'स्वच्छ गंगा मिशन'अंतर्गत डॉ. खैरनार यांच्या नेतृत्वाखाली संशोधन करण्यात आले होते. 'सीपीसीबी'चा अहवाल समोर येताच डॉ. खैरनार यांना यावर प्रतिक्रिया विचारण्यासाठी त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेतली असता त्यांनी यावर प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. महाकुंभादरम्यान गंगेच्या पाण्याच्या गुणवत्तेबद्दल उत्तर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाने (यूपीपीसीबी) सादर केलेल्या अहवालात तपशीलांचा अहवाल आहे असे म्हणत राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) बुधवारी उत्तर प्रदेश सरकार आणि 'यूपीपीसीबी'ला फटकारले. मंडळाने सादर केलेल्या अहवालात प्रयागराजमध्ये गंगेच्या पाण्यातील एफसी आणि ऑक्सिजनच्या पातळीसारखे पाण्याच्या गुणवत्तेच्या मापदंडांविषयी इतर तपशील पुरेसे सादर केले नाहीत असे 'एनजीटी'ने म्हटले आहे. लवादाने राज्य सरकारला प्रयागराजमध्ये निरनिराळ्या ठिकाणी नमुने घेऊन पाण्याच्या गुणवत्तेचा सर्वात अलिकडील विश्लेषण अहवाल सादर करण्यासाठी एका आठवड्याचा अवधी दिला.'एनजीटी'ने मागील वर्षी डिसेंबरमध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुपालनाविषयी दाखल याचिकेवर लवादासमोर सुनावणी सुरू आहे.

# स्वराज्यरक्षक - छत्रपती शिवबा



शिवाजी शहाजी भोसले छत्रपती शिवाजी महाराज म्हणून प्रसिद्ध, हे एक भारतीय राजे आणि मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन म्हणजे एक दैवी चमत्कार होता. त्यांची आई जिजाबाई ही लखुजी जाधवराव या निजामशाहीतील शुरसरदाराची मुलगी तर वडील शहाजीराजे भोसले हे स्वकर्तृत्वाने सामर्थ्यवान असलेल्या मालोजीराव भोसले यांचे चिरंजीव. राजकारणात मुरलेल्या व आनंदाचा उन्मेश बाळगणाऱ्या माता-पित्यांच्या पोटी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० यावर्षी वैशाख शुध्द द्वितीय पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहराजवळील शिवनेरी या डोंगरी किल्यावर झाला. त्यामुळे शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातल्याच नाहीतर अखिल भारतातल्या प्रत्येकाचे स्फुर्तीदायी दैवत आहे. इतिहासाच्या अभ्यासकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची नेमकी जन्म तारीख हा मतभेदांचा मुद्दा आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ (शुक्रवार, १९ फेब्रुवारी १६३०) ही शिवरायांची जन्मतारीख २००१ साली स्वीकारली. तेव्हापासुन महाराष्ट्र शासनाने शिवाजी महाराजांच्या जन्माच्या (शिवाजी जयंती) स्मरणार्थ १९ फेब्रुवारी हा दिवस सुट्टी म्हणून सूचीबद्ध केली आहे. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही एक जन्मतारीख मानली जात होती.

शिवाजी महाराजांचे नाव 'शिवाई' या देवतेवरून ठेवण्यात आले. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला जिजाबाईंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा अशी प्रार्थना केली होती म्हणून या मुलाचे नाव 'शिवाजी' ठेवले गेले. शिवरायांचे वडील शहाजीराजे भोंसले हे मराठा सेनापती होते, ज्यांनी दख्खनच्या सल्तनतची सेवा केली होती. त्यांच्या आई जिजाबाई होत्या, ज्या सिंदखेडच्या लखुजी जाधवरावांच्या कन्या होत्या. जाधव हे देवगिरीच्या यादव राजघराण्यातील वंशाचे होते. छ.शिवाजी महाराज हे मराठा जातीतील आणि भोसले कुळातील होते. त्यांचे आजोबा मालोजी अहमदनगर सल्तनतचे एक प्रभावशाली सेनापती होते आणि त्यांना 'राजा' ही उपाधी देण्यात आली होती. लष्करी खर्चासाठी त्यांना पुणे, सुपे, चाकण आणि इंदापूरचे देशमुखी हक्क देण्यात आले होते. त्यांना त्यांच्या कुटुंबाच्या वास्तव्यासाठी किल्ला शिवनेरी देखील देण्यात आला होता.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

जनमानसात शिवकार्यासंबंधी जी काही स्थुल कल्पना असते, त्यापेक्षा महात्मा फुल्यांची कल्पना फार वेगळी होती अर्थात एक लोकोत्तर शुरवीर पुरुष, जन्मजात जननेता, स्वराज्य संस्थापक, लोककल्याणाची सदैव काळजी वाहणारा राज्यकर्ता या विविध नात्यांनी शिवाजीची व शिवकार्याची जी महती आहे, ती फुल्यांना नि:संशय मान्य होती. परंतू शिवाजी हा हिंदूधर्मरक्षक होता, त्याचे राज्य हे हिंदू धर्मराज्य होते. तो गोब्राम्हण प्रतिपालक, क्षत्रीय कुलावतंस छत्रपती होता. अशी शिवकार्याची महती काहीजणांकडुन सतत आणि पध्दतशीरपणे मांडण्यात येते ती महात्मा फुल्यांना अजिबात मान्य नव्हती आणि त्यांना त्याबद्दल कौतुकही नव्हते.

शिवाजीला लढाईचे आणि राज्यकारभाराचे शिक्षण दादोजी कोंडदेव यांनी दिले. दहा-बारा वर्षाचे असतानाच शिवाजींच्या मनात स्वातंत्र्याचे वारे खेळू लागले. माझा देश मोगलांच्या आणि मुसलमानांच्या गुलामीतून मुक्त करायचा, माझ्या बांधवांना गुलामीतून आणि छळातून सोडवायचे. शिवाजींनी सफद्रीच्या कडेकपारीत भटकून सवंगडी गोळा केले. तानाजी, नेताजी, सुर्याजी, बाजी, वेसाजी असे एका पेक्षा एक जिवाला जीव देणारे मित्र गोळा केले. श्री रोहिडेश्वराच्या साक्षीने स्वराज्याची शपथ घेतली आणि एका स्वरात घोषणा दिली. 'हर हर महादेव' महाराष्ट्रातल्या मावळखोऱ्या पासुन त्यांनी आपल्या लढयाला आरंभ केला. साम-दंड-भेदांचा उपयोग करत अवघ्या चौदाव्या वर्षी शिवाजींनी 'तोरणागड' जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. मग त्यांनी मागे वळुन पाहिलेच नाही एका मागून एक गड आणि किल्ले जिंकून घेतले. पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली आणि स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली. युध्दात शक्तीपेक्षा युक्तीच्या वापर जाथुष केला. राक्षसी देहाचा अफजलखान भेटीचे ढोंग करुन शिवाजींचा घात करायला आला होता.

त्यांनी पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे जाण्यासही प्रेरणा मिळावी असे आपले चरित्र घडविले आणि एक मोठा आदर्श निर्माण केला कोणत्याही कार्याचा आरंभ लहानशा मर्यादेत होतो आणि पुढे ते कार्य मोठया मर्यादेत गेलेले आढळते. पवित्रगंगेचा उगम आणि पुढे तिचा झालेला विस्तार हे उदाहरण या दृष्टिने लक्षात घेण्या सारखे नाही कां? तर शिवाजी महाराजांचे कार्य जरी आरंभी महाराष्ट्राच्या विविध विषयाचा विरोध प्रकट करुन स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नापुरता मर्यादित असला तरी लोकांच्या मनात जी स्वातंत्र्य प्रेमाची ज्योत पेटली त्यामुळे पुढे भारतात दक्षिणोत्तर ती प्रेरणा निर्माण झाली.

१३ व्या शतकांत देवगिरीच्या यादवांची सत्ता संपविणाऱ्या परधर्मी काही सत्ताधिशांनी महाराष्ट्रावर पुढे दोन-तीनशे वर्षे सत्ता गाजविली. जसजशी त्यांची सत्ता मजबूत होत गेली, तसतशी त्यांच्यातली जुल्मी प्रवृत्ती वाढीला लागली. आपल्या प्रजेवर अन्यायाने कर लादणे, त्यांची घरे दारे आणि जमिनी बळकाविणे, स्त्रियांची अब्रू लुटणे आणि गुलाम म्हणून प्रजेला राबवणे असे प्रकार सुरु झाले. सारी मराठी माणसे मनातून या जुलूमी सत्तेवर रागावली होती, पण म्हणतात ना सत्ते पुढे शहाणपण चालत नाही - तशी अवस्था होती. औरंगजेब हा जबरदस्त लष्करी सामर्थ्यांचा, पराक्रमी, कट्टर मुसलमानपंथीय व दक्षिणेतील राजकारणाची माहिती असलेला बादशाह होता. पण शिवाजीने अफझलखान सारख्या पराक्रमी मुसलमान सरदारास यमसदनी पाठविल्यानंतर नंतर तो जिवंत असे पर्यंत महाराष्ट्रात येण्याची त्याची छाती झाली नाही. औरंगजेबाने शिवरायांना पकडून आग्रा येथे ठेवले, पण तेथूनही ते शिताफीने निसटले, तेव्हा औरंगजेबाने त्यांचा धसकाच घेतला.

स्वदेश स्वतंत्र व्हावा ही माता-पित्यांची इच्छा शिवाजीने पूर्ण केली. हिंदु धर्माचा पाडाव करुन सर्व हिंदुस्थान मुसलमानमय करुन टाकावाया महत्वाकांक्षेने झपाटलेला औरंगजेब हा दिल्लीच्या तख्तावर होता. शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा या तीन इस्लामी सल्तनतींमध्ये विभागलेली होती. विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवलकोंडयाची कुतुबशाही अशा वेढयात सापडलेला पूणे-सुपे परिसर या तिन्ही मुस्लिम राज्यांवर औरंगजेबाची हुकूमत होती. तो दिल्लीहून सतत त्यांना सैन्य व पैसा पुरावत होता. माता जिजाऊंनी शिवाजीराजांच्या मनात या अन्यायकारी वृत्ती विषयाचा विरोध आणि बीज निर्माण करुन स्वांतत्र्य आणि स्वराज्य या विषयींच्या निष्ठा निर्माण केल्या. शिवाजीराजांच्या अंगभूत गुणांचा विकास केला आणि हळूहळू शिवाजीराजे त्या दिशेने प्रयत्न करु लागले. मराठी माणसांच्या मनातल्या रागाला नेमकी दिशा दाखविण्यासाठी त्यांनी 'मराठा तितुका मेळवावा' हे सुत्र धरुन स्वातंत्र्यप्रेमी, पराक्रमी आणि निष्ठावान माणसांना एकत्र केले. यावेळी त्यांच्या लक्षात आले की, काही स्वार्थी मराठी माणसे सरदारकी, जहागिरी आणि मोठया हुद्यासाठी परक्या सत्ताधिशांच्या चाकरीत धन्यता मानून शिवाजीराजांच्या स्वातंत्र्य लढयाला विरोध करत होते.

रायगडावर भेट ठरली, मिठी मारण्याचे सोंग करुन त्याने शिवाजीवर तलवार चालवली. पण शिवाजी सावध होताच हातात लपविलेल्या वाघ नखांनी अफजलखानाचा कोथळाच बाहेर काढला. पळून गेला म्हणून शाहिस्ते खान भेटला, शिवाजी महाराज स्वराज्य निर्माण करतांना येणाऱ्या प्रत्येक संकटाला जोमाने सामोरे गेलेच पण त्यांचे संवगडीही त्यांना समर्थ साथ देत होते. सिंहगड सर करतांना तानाजी पडला. खिंड लढवितांना बाजीप्रभुने छातीचा कोट केला. महाडकर, प्रतापराव गुर्जर अशा एकाहुन एक शुर संवगड यांनी आपलं मत दिले. आपले प्राण दिले. तेव्हा स्वराज्य आकाराला आले. स्वराज्यात आता ८५ किल्ले आणि दोनशे चाळीस गड आहेत.

लोकांनी शिवाजी महाराजांना राज्यभिषेक करवून घेण्याचा आग्रह केला. महाराजांनी आपल्या मातेशी आणि जवळच्या सरदारांशी चर्चा करुन राज्यभिषेक करवून घ्यायचा असे ठरवले. काशीचे प्रसिध्द पंडीत गागाभट्ट धार्मिक विधी करण्यासाठी आले. स्वराज्याची राजधानी रायगड ठरली. शिवाजी राजा सिंहासनावर बसला. लोकांनी जयजयकार केला, छत्रपती श्री शिवाजी महाराज की जय' शिवाजी महाराजांनी आपले जीवन देव, देश आणि धर्म यासाठी वेचले. संत तुकाराम हे त्यांचे आध्यात्मिक गुरु होते तर संतरामदास हे त्यांचे राजकीय गुरु होते. शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक ६ जून १६७४ साली रायगडावर झाला. त्यानंतर थोडयाच काळात म्हणजे ६ वर्षानंतर ३ एप्रिल १६८० मध्ये शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले. रामदासांनी त्यांचे गुणगौरव करतांना म्हटले,

**निश्चयाच्या महामेरु । बहुत जणासी आधारु ।।**
**अखंड स्थितीच्या निर्धारु । श्रीमंत योगी ।।**

इतिहासाच्या पानावररयतेच्या मनावरमातीच्या कणावर-आणि विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारा राजा म्हणजे, राजा शिवछत्रपतींच्या ३९६ व्या जयंती दिना निमित्त मानाचा मुजरा.




## डोहोळे ग्रामपंचायती मार्फत माझी वसुंधरा अभियान अंतर्गत वॉल पेंटिंग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील ग्रुप डोहोळे ग्रामपंचायती मार्फत माझी वसुंधरा अभियान अंतर्गत वॉल पेंटिंग करून

**सामाजिक संदेश देत जनजागृती**

सामाजिक संदेश देत अभियान बाबत जनजागृती करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत नागरी आणि ग्रामीण क्षेत्रांसाठी राबविण्यात येणारा अनोखा एकात्मिक असा उपक्रम आहे. यामध्ये नैसर्गिक परिसंस्थांचे जतन व संरक्षण करण्यासाठीच्या विविध उपायांची अंमलबजावणी करणे आणि वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या पर्यावरणपूरक कृती उपक्रमांवर नागरिकांच्या सहभागास प्रोत्साहित करणे, या बाबी समाविष्ट केल्या आहेत. या अभियानाची रचना कार्बन पृथक्करण, हरित वायूचे उत्सर्जन कमी करणे आणि नागरिकांमध्ये शाश्वत जीवनशैलीचा प्रचार करणे या वातावरणीय बदलाच्या तीन महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी करण्यात आली आहे.

मागील वर्षभर चांगले माझी वसुंधरा अभियान मध्ये उत्तम काम करून डोहोळे ग्राम पंचायतिने भिवंडी तालुक्यात ठसा उमटविला आहे. माझी वसुंधरा अभियाना मार्फत सूचनांचे पालन करून आम्ही ग्रामपंचायत मार्फत अमंलबजावणी करतो असे ग्राम पंचायत अधिकारी परेश सोनावणे यांनी बोलतांना सांगितले.

## पंढरीत श्री छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरांमध्ये श्री स्वामी विवेकानंद चौकामध्ये, श्री शनिश्वर रिक्षा स्टॉप, मालवाहतूक संघटना, व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या यांच्या संयुक्त विद्यमाने. पंढरपूर शहरात श्री छत्रपती महाराज यांची जयंती ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली.

श्री छत्रपती महाराजांचे पूजन पंढरपूर तालुका पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर. पोलीस निरीक्षक श्री वाघे पंढरपूर शहर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी मालवाहतूक संघटनेचे अध्यक्ष श्री तात्या फडतरे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्री राजेंद्र कोरके पाटील, मंगेश महामाने, प्रमोद आटकळे, राजू पवार, बलराज शिकलकर राम शिकलकर, युवराज जाधव, श्रीकांत देवकर, अनंत शिकलकर काका खेडकर दिनेश सगरे, उमेश सगरे, बाळासाहेब सगरे, संतोष आजबे, मंगेश पवार, राजू माळी, रुपेश वाघमारे, बाबा कांबळे, इत्यादी शिवभक्त उपस्थित होते.



## जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : गौडगाव बु(ता. अक्कलकोट ) येथील श्री गुरु सिद्ध मल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगदुरु पंचाचार्य माध्यमिक उच्च माध्यमिक प्रशालेत अखंड हिंदुस्तान चे आराध्य दैवत श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती साजरा करण्यात आला.

प्रारंभी विश्वनाथ धानशेट्टी यांच्या हस्ते हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी. शरणया हिरेमठ गंगाधर नाग शेट्टी. मृत्युंजय सालीमठ श्रीशैल सावलतोट. गुरुपादया स्वामी व बहुसंख्या विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## शिवरायांची प्रतिमा डोक्यावर घेऊन मिरवण्यापेक्षा त्यांचे आचार विचार आपल्या मस्तकात भिनवणे आवश्यक आहे : डॉ. डेर्ले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : शिवरायांची प्रतिमा डोक्यावर घेऊन मिरवण्यापेक्षा त्यांचे आचार विचार आपल्या पुस्तकात विनवणे आवश्यक आहे असे प्रतिपादन डॉक्टर सीमा डेरले यांनी केले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळ व कला वाणिज्य महाविद्यालय इगतपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानविज्ञान वाचन चळवळ सप्ताह सपन्न झाला त्यात, शिवचरित्रातून आज आपण काय शिकावे? या विषयावर तिसरे पुष्प गुंफतांना त्या बोलत होत्या.

पुढे त्या म्हणाल्या, श्रीमान योगी या ग्रंथाच्या आधारे शिवराय हे उत्कृष्ट योध्दा, कुशल प्रशासक, प्रजाहितदक्ष असे रयतेचे राजे होते. मध्ययुगीन कालखंडात जाती व्यवस्था अतिशय कडक रितीने समाजात पाळली जात असे, परंतु शिवाजी महाराजांची भूमिका ही जातीव्यवस्थेला व वर्णव्यवस्थेला छेद देणारी होती. स्त्रियांच्या अब्रुला धक्का लागता कामा नये मग ती परकी असो वा शत्रूची स्त्री चा सन्मान कायम राहिला पाहिजे असा त्यांचा दृष्टीकोन होता, हे त्यांनी कल्याणच्या सुभेदाराची सून व रांझा गावच्या पाटलाचे उदाहरण देऊन पटवून दिले. शिवरायांचा प्रेरणा देणारा हा वेगळा इतिहास विद्यार्थ्यांपर्यत पोचायला हवा. शिवाजी महाराजांची प्रतिमा डोक्यावर घेऊन मिरवण्यापेक्षा त्यांच्ये आचार, विचार आपल्या मस्तकात भिनवणे आवश्यक आहे असेआवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

यावेळी डॉ. प्रतिभा जाधव, नवनाथ वाघचौरे, डॉ.सीमा डेर्ले या ग्रंथ अन्वेषकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. व्याख्यानमालेचे प्रास्तविक बहि:शाल शिक्षण मंडळाचे केंद्र कार्यवाह प्रा.के व्ही दुनबळे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रतिभा हिरे यांनी मार्गदर्शनपर विचार मांडले. व्याख्यानमालेसाठी समन्वयक प्रा.शशिकांत सांगळे, प्रा.अविनाश कासार, प्रा.ललिता अहिरे यांचे सहकार्य लाभले.

## डुबेरे येथील जनता विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अखंड भारत देशाचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांना जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते.व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक सोमनाथ गिरी, सोमनाथ पगार, अलका काळोगे, विद्या ठाकरे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे व प्रतिमेचे पूजन करण्यात आले होते . छत्रपती शिवाजी महाराजांची सामूहिक आरती करण्यात आली.




विद्यार्थ्यांनी भगवे फेटे परिधान करून पारंपरिक वेशभूषा केली होती. मानसी वारुंगसे, प्रणव पावसे व मानसी जाधव यांनी सध्याच्या पिढीला उपयुक्त असे प्रबोधनपर विचार मांडून सर्वांची मने जिंकली. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवकालीन कसरतीचे खेळ करून दाखविले. महाराज यांच्या जीवन व कार्याविषयी विद्यालयातील शिक्षकांसह विद्यार्थी शितल ढोली, अंकिता ढोली, तन्वी कुटे, श्रावणी वारुंगसे, आर्यन वाजे, स्वरा वारुंगसे, अनुष्का माळी, प्रिया वाजे, अनन्या कडभाने, दर्शन वारुंगसे, गौरी वाजे, अक्षदा वारुंगसे, आराध्या वाजे आरोही जाधव तसेच कार्यक्रमाचेअध्यक्ष रामदास वाजे यांनी महाराजांचे कर्तृत्व विद्यार्थ्यांना विशद केले. जीवनात आई, वडील व गुरू यांना विसरू नका. शिवाजी महाराजांच्या कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा असे आव्हान वाजे यांनी केले सूत्रसंचालन पी.आर.करपे यांनी केले तर आभार डी.एच.जाधव यांनी मानले. यावेळी पोलीस पाटील रामदास वारुंगसे, डी. ए. रबडे, सुदाम वारुंगसे, रवि गोजरे, किशोर शिंदे आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून हाणामारी; सात जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : किरकोळ कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ३१ जानेवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास मोदी कब्रस्तान जवळ घडली.




याप्रकरणी मोहम्मद उस्मान मोहम्मद इकबाल नदाफ (वय-३४,रा.सहारा नगर भाग २, होडगी रोड) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अब्दुल रशीद नदाफ, सोहेल रशीद नदाफ, फिरोज रशीद नदाफ, तौसीफ रशीद नदाफ (रा.मदने नगर,सैफुल) व इम्तियाज नौशाद नदाफ,अदनान शेख (रा.फॉरेस्ट) तसेच शाहिद दस्तगीर नदाफ (रा.सारा नगर भाग १) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांचे सासू व सासरे यांचा कौटुंबिक वादाच्या कारणावरून फिर्यादी हे त्यांना पाठिंबा देतात याचा संशय असल्याने फिर्यादी यांचा मेव्हणा याचा फिर्यादीवर राग आहे.त्यावरून वरील संशयित आरोपी यांनी मिळून फिर्यादीस लाथा बुक्क्यांनी हाताला, पायाला, तोंडावर मारून मुक्कामार दिला. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत

# तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा अंगिकार करावा : प्रा. मधुकर पाटील

## स्वेरीत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'छत्रपती शिवाजी महाराजांनी तरुणाईला नवा विचार, नवे संस्कार देण्याचे कार्य केले. 'जगायचे कसे' हे छत्रपती शिवाजी महाराजांनी शिकवले तर 'लढायचे कसे' हे धर्मवीर छत्रपती संभाजी राजांकडून शिकले पाहिजे. छ.शिवाजी महाराजांची युद्धनिती, प्रशासन व्यवस्था, गडकोट किल्ले, बांधणी, पायाभरणी,उत्तम प्रशासक,नेतृत्वगुण, दूरदर्शीपणा असे अनेक महत्त्वाचे गुण राजांच्या कार्यातून डोकावतात म्हणून सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समजून घ्यावा लागेल. स्वराज्य निर्माण करताना त्यांनी केलेला संघर्ष ऐकताना आपल्यात चैतन्य निर्माण होते. त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टींतून लढण्यासाठी बळ मिळते. आलेली संकटे ही भीतीने पळून जाण्यासाठी नव्हे तर काहीतरी नवीन निर्माण करण्याची संधी निर्माण करते हे राजांच्या निर्णयावरून दिसून येते. यासाठी तरुणांनी मरगळ झटकून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा अंगिकार करावा.'असे प्रतिपादन कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठ अधिसभा सदस्य प्रा. मधुकर पाटील यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मध्यवर्ती असलेल्या भव्य ओपन एअर थिएटरमध्ये आयोजिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मधुकर पाटील हे शिवविचार मांडत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव व प्राचार्य डॉ.जे.जी. जाधव हे होते. शिव आरती, महाराष्ट्र गीत व स्वेरी गीतानंतर प्रास्ताविकात स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे म्हणाले, 'महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनण्यासाठी 'कम्फर्ट झोन'च्या बाहेर जाऊन काम करणे आवश्यक आहे आणि कम्फर्ट झोनच्या बाहेर जाऊन काम करण्याची प्रेरणा ही शिवाजी महाराजांकडून मिळते. म्हणून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी व कुटुंबाची, समाजाची व देशाची सेवा करण्यासाठी कम्फर्ट झोनच्या बाहेर येऊन काम करावे'. असे सांगून जीवनात यशस्वी होण्यासाठी तीन महत्वाचे कानमंत्र दिले. प्रा. पाटील पुढे म्हणाले की, 'प्रामाणिकपणा अंगीकारायचा असेल तर शिवचरित्र वाचा. कारण ते मरायला नाही तर जगायला शिकवते.' असे सांगून प्रा. पाटील यांनी औरंगजेबासह शाहीस्तेखान, मुकर्रब खान, अफजल खान, फाजल खान, उदयभानू राठोड, संभाजी कावजी, जीवा महाले, तानाजी मालुसरे, शिवा काशीद, येसाची कंक या व्यक्तींवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला. पुरंदरचा तह, गनिमी कावा, वासोटा किल्ला, सुरतवरील हल्ला या अशा अनेक घटना तारखेसह सांगितल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ.जे.जी. जाधव म्हणाले की, 'या पृथ्वीतलावर अनेक राजे होऊन गेले परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणात जयंती साजरी फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचीच केली जाते. त्याचे कारण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज हे कल्याणकारी राजे होते. त्यांच्या कार्याचे अनुकरण करावे. राजे हे रयतेसाठी लढणारे राजे होते. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशी घोषणा जरी दिली तरी अंगावर रोमांच उभे राहतात. एवढी ऊर्जा राजांपासून मिळते. शिवजयंतीच्या निमित्ताने स्वेरीतील उत्साही वातावरणातील विद्यार्थ्यांनी साकारलेल्या पालखी पूजन पाहिले असता या विद्यार्थ्यांचा व स्वेरी संस्थेचा अभिमान वाटतो कारण डॉ. रोंगे सर हे कर्मवीर भाऊराव पाटलांचे कार्यपुढे नेत आहेत असे दिसून येते. समाजातील वंचितांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले तर डॉ.रोंगे सरांनी ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थी विद्यार्थिनींना तंत्रशिक्षण देण्याचे कार्य करण्यासाठी इंजिनिअरिंग कॉलेजची निर्मिती केली. श्रीमंतांची मुले शिक्षणासाठी परदेशात जातात पण पंढरपूर आणि पंचक्रोशीतील विद्यार्थी परदेशात न जाता स्वेरीत शिक्षण घेतात याचा अभिमान वाटतो.' यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी शिवचरित्राविषयी प्रश्न विचारले असता प्रा. पाटील आणि प्राचार्य डॉ. जाधव यांनी अभ्यासपूर्ण व समाधानकारक उत्तरे दिली.यावेळी स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, विश्वस्त बी.डी.रोंगे, विठाई पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन अमोल पाटील, माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके, कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे,डिग्री इंजिनिअरींगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी सचिवा नम्रता घुले, अर्चना कोंगारी, प्रणव कवडे, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग, इंजिनिअरिंग व फार्मसीच्या पदवी व पदविकेमधील विद्यार्थी उपस्थित होते. गायत्री जाधव, समृद्धी पाटील व डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## छत्रपती शिवरायांचा वारसा जगासाठी प्रेरणादायी आहे, तो तरुण पिढीसमोर आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे : शिवानंद मठपती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : छत्रपती शिवरायांचा वारसा जगासाठी प्रेरणादायी आहे. तो तरुण पिढीसमोर आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. आणि स्वराज्यात त्यांनी दीनदुबळ्यांना, कष्टकरी शेतकऱ्यांना न्याय दिला. महाराजांनी केव्हाही जातीयवाद केला नाही. छत्रपतींचे कार्य, कर्तृत्व समजून घेण्यासाठी त्यांचे जीवनचरित्र अभ्यासले पाहिजे,' असे मत सेवानिवृत्त शिक्षक शिवानंद मठपती यांनी व्यक्त केले.

येथील लोकमंगल विहार परिसरात श्री वटवृक्ष तरुण मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भगवा कट्टा ध्वजस्तंभासह श्री वटवृक्ष सार्वजनिक वाचनालयाच्या शुभारंभ प्रसंगी मठपती

प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश शिंदे हे होते. व्यासपीठावर वेदमूर्ती रुद्रय्या स्वामीजी, पौरोहित्य गुड्डय्या स्वामी, मनोज निकम, माजी क्रिडा शिक्षिका उषा हंचाटे, बासलेगांवचे माजी सरपंच जगदीश बिराजदार, मंडळाचे अध्यक्ष बसवराज आगरखेड, कार्याध्यक्ष चंद्रकांत दसले, नागराज कुंभार आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सवनिमित्त भगवा कट्टा या ध्वजस्तंभाचे पूजन, दिपप्रज्वलन व पुतळा पूजन श्री वेदमूर्ती रुद्रय्या स्वामीजी व लोखंडे मंगल कार्यालयाचे संचालक शिवाजीराव लोखंडे यांच्या हस्ते व पुरोहित गुड्डय्या स्वामी शास्त्री यांच्या विविध मंत्रोपचाराने करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर गुड्डय्या स्वामी, उषा हंचाटे व प्रसाद फडतरे यांचेही व्याख्यान झाले. प्रास्ताविक भाषणात परिसरातील नागरिकांना दैनिक वर्तमानपत्र वाचनाची सोय व्हावी या उद्देशाने श्री वटवृक्ष सार्वजनिक वाचनालयाचे शुभारंभ करण्यात आले आहे. विशेष म्हणजे परिसरातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना मोबाईल पासून दूर ठेवण्याच्या उद्देशाने आणि वाचन संस्कृती वाढविण्याच्या मूळ उद्देशाने सदरची वाचनालय सुरू करण्यात आले असल्याचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दसले यांनी सांगितले. या सर्व कार्यक्रमास माजी सैनिक अनिल हत्ते, मलप्पा सोड्डे, इरण्णा पाटील, विजयकुमार हौदे, हनुमंत घोसले, बाबुराव विभूते, ॲड. सविता बाके, कलाशिक्षक वन्यालोलू, माजी प्रा. चंद्रकांत पाटील, माजी नगरसेविका भागुबाई कुंभार, माजी नगरसेवक केरबा होटकर, मारुती आळवीकर, वेदेश गुरव, सचिन डिग्गे, पोलिस बसवराज कुंभार, दिगंबर साळुंखे, महिला मंडळ आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सदस्य विरुपाक्ष कुंभार यांनी केले.

## राजांचे राजेपण हे वारश्याने नाही तर कर्तुत्वाने : सुरळीकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे राजे पण वारसा हक्काने न मिळता कर्तुत्वाने मिळालेले आहे म्हणूनच ते खरे रयतेचे राजे आहेत असे प्रतिपादन सुहास सुरळीकर यांनी केले. श्री मानकेश्वर वाचनालयात आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त निमित्त ते बोलत होते. तत्पूर्वी वाचनालयाचे संचालक बाळासाहेब कर्डिले यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमाचे पूजन करण्यात आले. आपल्या प्रास्ताविकात अध्यक्ष मधुकर शेलार यांनी




सुमारे चारशे वर्षानंतरही महाराजांच्या कर्तुत्वाचे पोवाडे गायले जातात यातच त्यांचे मोठेपण आहे, असे सांगितले. या कार्यक्रमास वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, उपाध्यक्षा डॉ. सौ. मेघा जंगम, चिटणीस प्रा. बाळासाहेब कापसे, हिशोब तपासणीस दत्ता ऊगावकर, संचालक तन्वीर राजे, सुहास सुरळीकर, बाळासाहेब कर्डिले, राजेंद्र खालकर, सुनील चिखले, रघु भाऊ कुंदे, माजी संचालक अशोक पगारे, संजय घुमरे, दयानंद डगले,प्र. ग्रंथपाल नितीन बनसोडे सहाय्यक ग्रंथपाल विद्या बंद्रे, नंदकुमार पुंड, अनिता इस्ते आदी उपस्थित होते.

## अखिल भारतीय मराठा महासंघ पंढरपूर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अखिल भारतीय मराठा महासंघ पंढरपूर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रतिमेचे पूजन उद्योजक संजयमामा कोकाटे, उद्योजक सुहास शिर्के,प्रांत कार्यालय ऑफिसचे चंद्रकांत ढवळे,तलाठी मुसाफ काझी,महादेव देठे, अखिल भारतीय मराठा महासंघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण यांच्या शुभहस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून करण्यात आले. यावेळी परिसर शिवरायांच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. त्यानंतर भव्य असा पालखी सोहळा प्रदक्षना मार्गावरुन काढण्यात आला. यावेळी बाल शिवभक्तांनी सुंदर असे लेझीम सादर केले.यावेळी पारंपारिक वाद्य सनई चौघडा, घोडे,बैलगाडी,ढोल ताशांचा गजर यांचाही समावेश होता.यावेळी घोड्यांवर बाल शिवभक्त,जिजाऊंच्या लेकी शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊंच्या वेशभूषेत होते. तसेच बाल शिवभक्तांनी शिवाजी महाराजांच्या गाण्यावरती सुंदर असे नृत्य सादरीकरण केले.




यावेळी उपस्थित माता, भगिनी व बांधव डोक्यावर भगवा फेटा बांधून होते. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सचिन गंगथडे, युवक जिल्हाध्यक्ष शिवाजीराजे मोरे, पंढरपूर तालुकाध्यक्ष संतोष जाधव, शहराध्यक्ष अमोल पवार जिल्हा सचिव गुटाळ, विलास देठे सर, सतिश धनवे सर, विद्यार्थी जिल्हा अध्यक्ष हनमंत कदम, शहर उपाध्यक्ष शामराव साळुंखे, शहर संघटक काका यादव, रिक्षा संघटना अध्यक्ष नागेश गायकवाड, शहर कार्याध्यक्ष पांडुरंग शिंदे, महिला जिल्हाध्यक्षा प्रभावती गायकवाड, शहराध्यक्षा डॉ संगीता पाटील, युवती जिल्हाध्यक्षा अँड प्राजक्ता शिंदे, तालुका उपाध्यक्षा अर्चनाताई चव्हाण, शहर उपाध्यक्षा अश्विनीताई साळुंखे, राधिका ताई चव्हाण, संग्राम आसबे, सचिन थिटे, रोहित भैया चव्हाण लखन चव्हाण वैभव चव्हाण गणेश माने, आनंद काळे आशपाक तांबोळी यांच्या सह मराठा महासंघाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**राष्ट्रीय सेवा योजना आणि इतिहास विभागाच्या वतीने संपन्न**

**विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थ्यांची उपस्थिती**

# पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन समारंभ समिती, राष्ट्रीय सेवा योजना आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे आणि उपप्राचार्य डॉ. राजेश कवडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने




उपस्थिती होती.

प्रतिमा पूजनानंतर, छत्रपती शिवाजी महाराज - एक व्यवस्थापन गुरु या विषयावर प्राध्यापक डॉ. उमेश साळुंखे यांनी व्याख्यान दिले. ते आपल्या व्याख्यानात म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या निर्मितीसाठी उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्य वापरले होते. त्यांच्या राज्याची मध्यवर्ती संकल्पना कल्याणकारी राज्य होती. त्यांनी आस्मानी आणि सुलतानी संकटांना धैर्याने तोंड दिले. शिवाजी महाराजांनी 'गनिमी कावा' या संकल्पनेचा योग्य वापर करून रयत आणि राजा यांच्यात आत्मिक संबंध निर्माण केले. त्यांच्या राज्यात रयतेप्रती निष्ठा, स्वामीनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा आणि धर्मनिष्ठा यावर भर दिला होता. या निष्ठेमुळेच लोक स्वराज्यासाठी प्राणार्पण करण्यास तयार होते.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या १८ व्या वर्षी आदिलशहाचा पराभव करून जावळीच्या मोऱ्यांवर वचक बसवला होता. त्यांनी ३५ वर्षांच्या कालखंडात ११ किल्ले बांधले आणि स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्याच्या स्थापनेसाठी त्यांनी ६०० मावळे सोबत घेऊन कार्यास सुरुवात केली आणि शेवटी तीन लाख मावळे स्वराज्यासाठी जोडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व वक्त्यांचा परिचय समारंभ समितीचे प्रमुख प्रा. डॉ. दत्ता डांगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. भारती सुडके यांनी केले. शेवटी, उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. रविराज कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमास राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुशील शिंदे, मराठी विभागप्रमुख डॉ. रमेश शिंदे आणि इतर मान्यवर प्राध्यापक, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.



## छत्रपती शिवाजीराजे नेहमीच महिलांना आदराचे स्थान दिले : शैलशिल्पा जाधव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. त्यांनी मुठभर मावळ्यांना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजीराजांनी नेहमीच महिलांना आदराचे स्थान दिले असे प्रतिपादन संस्थेच्या अध्यक्षा शैलशिल्पा जाधव यांनी केले.

श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालयात शिवजयंती साजरी करण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन ड.प्रशांत शहा यांच्या हस्ते करण्यात आले.

शिवजन्मोत्सव देश विदेशात साजरा केला जातो. शिवाजी महाराज हे पराक्रमी व लढवय्ये होते.म्हणूनच त्यांना सह्याद्रीचा सिंह असे म्हणत. शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप असे त्यांचे कर्तृत्व होते.असे संस्थेच्या उपाध्यक्षा आरती काळे यांनी सांगितले.या प्रसंगी संस्थेचे सचिव लक्ष्मण पाटील, ग्रंथपाल दत्तात्रय बाबर, दिनकर शिंपी, स्नेहा नरके आदी उपस्थित होते.

